प्रेस नोट दि. ०६/०३/२०२४

आर.टी.ओ. पुणे येथील खाजगी एजंन्ट यास लाच स्विकारतांना अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने पकडले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो/घटक | :– | ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक | :– | सासवड पो.स्टे., पुणे ग्रामीण ता. पुरंदर जि. पुणे.<br>ठाणे दैनंदिनी क्र. २१/२४ दि.०६/०३/२०२४ |
| खाजगी इसम नांव व पत्ता | :– | १) श्री. जावेद अकबर शेख, वय ३३ वर्षे, खाजगी इसम, धंदा– आर.टी.ओ. पुणे येथे एजंन्ट, आणि धंदा–रेडीयम स्टिकर नंबर प्लेट विक्री. |
| पाहीजे आरोपीत खाजगी इसम नाव,पत्ता | :– | २) देवेंद्र खिंवसरा ३) गिरीष भोगळे, ४) भावडया चौधरी सर्व आर.टी.ओ पिंपरी चिंचवड व पुणे येथे एजंन्ट, |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | २०,०००/–रू. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | २०,०००/–रू. |
| थोडक्यात हकीगत | :– | यातील तक्रारदार हे ट्रान्सपोर्ट कार्यालयामधे कामास असुन त्यांचे ट्रान्सपोर्ट मधील वाहनावर आर.टी.ओ.पुणे आणि पिंपरी चिंचवड यांचेकडुन ओव्हर लोडींगची कारवाई न करण्यासाठी प्रत्येक गाडीचे ४०००/–रू. असे एकुण पाच गाडयांचे २०,०००/–रू. खाजगी इसम यांनी लोकसेवक आर.टी.ओ अधिकारी यांचेकरीता मागणी केल्याची दिनांक ०५/०३/२०२४ रोजी तक्रार प्राप्त झाली होती.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने पंचासमक्ष पडताळणी केली असता आरोपीत क्र १ श्री. जावेद अकबर शेख याने तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने सापळयाचे आयोजन करून आज दिनांक ०६/०३/२०२४ रोजी वरील नमुद खाजगी इसम यांनी तक्रारदार यांचेकडुन २०,०००/–रू. लाचेची रक्कम स्विकारतांना आर.टी.ओ. पुणे यांचे वाहन चाचणी केंद्र दिवे ता. पुरंदर जि.पुणे येथील मोकळया आवारात रंगेहात पकडण्यात आले आहे. त्याच्याविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी–मा.श्री.सुनिल लोखंडे सो, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काहीमाहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

१) संपर्क पत्ता :–लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :–acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई–मेल आयडी :–spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :–acbmaharashtra.net
५) टोल फ्री क्रं. :– १०६४
६) दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९९

पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सत्यमेव जयते, ठाणे

(राजेश जाधव)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे